म. ग्रं. सं. ठाणें

विषय निबंध

संग्रहालय क्रमांक ११५ / ७८०

लेखक गणेश रामकृष्ण वैद्य

पुस्तकाचें नांव पूर्वेकडील वर्णव्यवस्था व पश्चिमेकडील वर्गव्यवस्था

सन १८९९


११५

क्र. ७८०

वर्णव्यवस्था

व्यवस्था

निबंध

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
अ. नं.

# पूर्वेकडील वर्णव्यवस्था

व

# पश्चिमेकडील वर्गव्यवस्था.

किंमत एक आणा.

# पूर्वेकडील वर्णव्यवस्था व पश्चिमेकडील वर्गव्यवस्था.

याविषयावर

श्रीमती आनीबेसंटबाई यांनीं दिलेल्या व्याख्यानांचें

मराठी भाषांतर.

थिआसाफिकल सोसायटीचे श्रीक्षेत्र वाई येथील सभासद

रा. रा. गणेश रामकृष्ण वैद्य यांनीं केलें

तें,

या सभेच्या हिंदुस्थानांतील विभागासंबंधानें मराठी

भाषेकरितां नेमले गेलेले

रा. ब. जनार्दन सखाराम गाडगीळ व रा. रा. रामचंद्र

पुरुषोत्तम कामत,

सदर्हू सभेचे सभासद यांनीं पसंत केलें व,


वाई मोदवृत्त छापखान्यांत दामोदर लक्ष्मण लेले

यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सन १८९९ इसवी.

किंमत एक आणा.

# EASTERN CASTES

## AND

## WESTERN CLASSES.

A lecture by Mrs. ANNIE BESANT.

Translated into Marathi by

G. R. Vaidya F. T. S.

*residing at Wai.*

Supervised and approved by

Messrs. J. S. Gadgil F. T. S.& R. P. Kamat F. T. S.

appointed by the Indian Section of the THEOSOPHICAL SOCIETY to supervise the translation of Theosophical books into Marathi.

Printed and published by

DAMODAR LAXMAN LELE.

at the " MODAVRITTA PRESS." Wai.

1899.

*Price One Anna.*

# पूर्वेकडील वर्णव्यवस्था व पश्चिमेकडील वर्गव्यवस्था.

( श्रीमती अनीचिझांट बाई ह्यांनीं दिलेलें व्याख्यान. )

पूर्वेकडील देश घ्या किंवा पश्चिमेकडील देश घ्या प्रत्येक देशांत माणसांमध्यें वर्गभेद आढळतात, त्यांविषयीं मला आज बोलावयाचें आहे. हे भेद आज आहेत व ते अनादि कालापासून आहेत. हें मी तुह्मांस दाखवून देण्याचा प्रयत्न करणार आहें. हे भेद स्वाभाविक विभागांमुळें झालेले आहेत. हे भेद पूर्वेकडे कसे आहेत; पश्चिमेकडे कसे आहेत; पूर्वीं कसे होते व आतां कसे आहेत; हें पाहूं. कारण, पाठीमागील चुकांवरून शहाणपण शिकणें व त्यावरून आपण पुढें कसें चालावें हें ठरविणें हें मनुष्याचें कर्तव्य आहे असा माझा समज आहे. या भेदांसंबंधानें या पूर्वेकडील देशांत व तसाच पश्चिमेकडील देशांतही मोठा खल चाललेला आहे व भेदांविरुद्ध असणारा पक्ष तर त्यास पाण्यांत पहात आहे. ह्मणून या विषयाचें विवेचन करितेवेळीं पूर्वेकडे या भेदाचें स्वरूप, जो

जातिभेद किंवा वर्णभेद आहे तो एका अंगास घेऊं व पश्चिमेकडे याच भेदाचें स्वरूप वर्गभेद ह्मणून आहे तो दुसऱ्या अंगास घेऊं. हे दोन्ही भेद पूर्वी कसे होते तें पाहूं व आज कसे आहेत तें पाहूं. असें केल्यानें आपण पुढें काय करावें हें ठरवितां गेईल व आपली सामाजिक स्थिति सुधारून समाजस्थितीला बळकटी येण्यासाठीं काय काय सुधारणा केल्या पाहिजेत व कोणत्या तत्वाप्रमाणें आपण वागलें पाहिजे हें कळून येईल.

प्रथमतः मला ही गोष्ट सुचवावयाची आहे कीं, कोणता कां देश असेना त्यांत कसली कां समाजपद्धति असेना, कसल्या कां प्रकारची राज्यव्यवस्था असेना, तेथील लोकांचा कोणता कां धर्म असेना व त्यांचा राज्यकारभार कसला कां असेना; तथापि असे कांहीं स्वाभाविक विभाग आहेत कीं ते प्रत्येक देशांत तुह्मांस सांपडावयाचेच. सर्व जगतांत मोठे मोठे चार स्वाभाविक विभाग आहेत. त्यांच्या शिवाय कोणताही समाज कायम रहावयाचा नाहीं. त्यांच्या शिवाय राष्ट्र जीव धरून रहाणारच नाहीं. आतां एका देशांत ही व्यवस्था एका नांवानें लोकांस ठाऊक असेल व दुसऱ्यांत तिला तें नांव नसेल. हे स्वाभाविक चार विभाग असे आहेत. पहिलाः—सर्वजातींच्या माणसांचें

देहरक्षण झालें पाहिजे; त्यांना अन्न, वस्त्र, निवारा व देह-
धारी प्राण्यांस लागणाऱ्या अवश्यक वस्तु प्राप्त झाल्या पाहिजेत.
ह्मणून समाजांतील पुष्कळ मनुष्यें त्या उत्पन्न करण्यांत गुंत-
लेलीं असतात. हा उत्पन्न करणारांचा मोठा वर्ग झाला. या
वर्गावर देशाच्या हिताचा, उद्योगाचा, सुखाचा व सर्व भरभ-
राटीचा पाया आहे. या समूहास उत्पादकांची जात असें नांव
द्या अथवा उत्पादकांचा वर्ग असें नांव द्या; पण वस्तु एकच.
हा उत्पादकांचा वर्ग झाल्यानंतर दुसरा विभाग व्यापारी
वर्गाचा येतो. उत्पादक वर्गानें उत्पन्न केलेले जिन्नस लागतील
ते प्रत्येकास मिळावेत ह्मणून उत्पन्न करणारापासून ते एकत्र
करून सर्व देशभर फैलावावे लागतात. मनुष्य कोठेंही असला
तरी त्याचें देहरक्षण होण्यासाठीं लागणाऱ्या वस्तु मिळाव्या.
तात्पर्य, त्या दूर उत्पन्न झाल्या असल्या तरी सर्व देशांत त्यांचा
फैलाव होण्यासाठीं या मोठ्या व्यापारी वर्गाची अवश्यकता
आहे. असे हे समजांतील उत्पादक व व्यापारी विभाग झाल्या-
नंतर तिसरा एक मोठा विभाग ह्मणजे राष्ट्राचा संरक्षक वर्ग हा
होय. यामध्यें लष्करी शिपाई व आरमारावरील शिपाई हे येतात.
ते परचक्रापासून देशाचा बचाव करितात. यांतच कायद्याचा

अंमल करणारे व अंतर्व्यवस्था नीट राखणारे असे पोलीस, वकील, न्यायाधीश, प्रधानमंडळ व राजे हे येतात. हा वर्ग समाजाची व्यवस्था करितो. याच्या छत्राखाली उत्पादक वर्गाची व व्यापारी वर्गाचीं कामें बिनधोक सुरक्षित चालतात. तेणेंकरून त्यांस कोणत्याही परचक्राची अथवा चोरचिलटांची वगैरे भीति रहात नाहीं. हे जे विभाग सांगितले ते स्वाभाविक असून त्यांशिवाय चालावयाचें नाहीं. माल उत्पन्न करणारावरच जर त्याचा देशांत फैलाव करण्याचें काम पडेल तर माल उत्पन्न करावयाचें त्याचे हातून नीट व्हावयाचें नाहीं. माळ विकावयास घेऊन जाण्यांत जर तो गुंतेल तर वेळेस त्याची शेताची नांगरणी राहील; गुरें कोणी वळणार नाहीं; व जीं कामें त्यानें स्वतः करावयास पाहिजेत त्याची हेळसांड होईल. माल देशांत फैलावणें हें दुसरा करूं शकेल आणि ह्मणून हे उत्पादक व व्यापारी वर्ग निरनिराळे असले ह्मणजे दोघांचीही कामें नीट चालतील. त्याप्रमाणेंच जर राज्यव्यवस्था करून रक्षण करणारा वर्ग नसेल तर उत्पादकाला व व्यापाऱ्याला स्वतःच शिपायाचें व पोलिसाचें काम करावें लागेल. ह्मणजे ज्या त्या कामाचा चुथडा; एकही नीट व्हावयाचें नाहीं.

सुधारलेल्या समाजाची खूण ही आहे कीं, सदरहू कामें निरनिराळीं असतात; तीं निरनिराळे लोक करितात व तेणें-करून सर्वांचेंही हित होतें. याप्रमाणें तीन मोठे मोठे विभाग झाले. १ उत्पादक; २ व्यापारी आणि ३ रक्षक व राज्यकर्ता असे वर्ग झाले तरी मनुष्याच्या कर्तृत्वाचा एक विभाग जशाचा तसाच अद्यापि राहिला आहे व तो समाजाच्या प्रगतीसाठीं आणि लोकांना उर्जित दशा येण्यासाठीं अत्यंत आवश्यक आहे. तो कोणता ह्मणाल तर गुरूचें कर्तव्य हा होय. गुरु कोणते तर शास्त्राचें, तत्त्वज्ञानाचें व धर्माचें शिक्षण देणारे. हा गुरुवर्ग जर नसेल तर राष्ट्राच्या वाढीचें एक अंगच उणें आहे, असें ह्मणावें लागेल. हा गुरुवर्ग जर नसेल तर मनुष्य काय व पशु काय सारखाच. मनुष्याचें मन त्याच्या इंद्रियांत श्रेष्ठ आहे. त्यास शिकविलें पाहिजे; वळविलें पाहिजे; त्याला पक्क दशा आली पाहिजे; त्याला नीट ओळ लाविली पाहिजे. मनुष्याचे अंगीं मनुष्यत्व रहावें, त्यानें पशु राहूं नये, आणि ज्याप्रमाणें त्याला अन्नपाणी घेऊन शरीर रक्षण करावें लागतें, त्याप्रमाणेंच त्याच्या आत्म्याचीही सुस्थिति राहिली पाहिजे. ह्मणून वर सांगितलेल्या गुरूंची अवश्यकता आहे.

असे हे मोठे चार स्वाभाविक विभाग आहेत. या कामांची जरूरी प्रत्येक लोकांना असते. हीं कामें प्रत्येक समाजांत झालीं पाहिजेत. " हीं कामें आहेत काय ? " असा कोणत्याही लोकांविषयीं प्रश्न नाहीं. कारण, तीं आहेतच. पण जेणेंकरून देशांत सुव्यवस्था राहील, झोटिंग पादशाही होणार नाहीं व समाधानवृत्ति राहून कधीं तंटे बखेडे चालणार नाहींत अशा प्रकारें सुव्यवस्थितपणें तीं कामें होण्याची रीत कोणती ? या प्रश्नाचा उलगडा करणें आहे. ज्याप्रमाणें प्राणयात्रा चालण्यासाठीं या मनुष्य देहांत निरनिराळीं इंद्रियें लागतात. उदाहरणार्थ विचार करण्यासाठीं तुह्मांस मन लागतें; श्वासोश्वास करण्यासाठीं तुह्मांस फुफ्फुसें लागतात; पचनक्रियेसाठीं तुह्मांस पक्काशय लागतो; काम करण्यास हात व चालण्यास पाय लागतात; पण हातपायच जर मनाचें काम करूं लागतील, मनालाच जर कधीं कधीं चालण्याचें काम करावें लागलें, पक्काशयाला जर कधीं वाटलें कीं आपणांस श्वासोच्छ्वास करितां येईल व फुफ्फुसांनीं जर पचनक्रियेचें काम पतकरलें तर देह कांहीं चालणार नाहीं व सर्व अव्यवस्था होईल. त्याप्रमाणेंच प्रत्येक सुधारलेल्या व सुव्यवस्थित समाजांत हीं कामें ठरलेल्या इंद्रियांच्या द्वारानींच व्हावीं

लागतात. अशाकरितां कीं तंटे, भांडणें व संकटें येऊं नयेत. असें असेल तरच समाज जीवंत राहील; नाहीं तर ज्यांचा एकमेकांशीं संबंध नाहीं अशा निरनिराळ्या तुकड्यांची तो एक रास होईल. त्यांत नेहमीं भांडणें राहतील आणि " अव्यापारेषु व्यापार " सुरू होईल.

आतां आणखी एक गोष्ट लक्ष्यांत ठेवावयाची ती अशी कीं, ज्याप्रमाणें शरीरांत ऐक्यभाव आहे त्याप्रमाणें मनुष्य जातही ऐक्यभावाची आहे. ऐक्यभाव ह्मणजे एकरूपता नव्हे; ऐक्यभाव ह्मणजे सर्वांची साम्यता व समता नव्हे. चूक होते ती येथेंच होते; आणि यामुळेंच सर्व घोटाळा होतो. शहाणे सारखे व अज्ञानीही सारखे असे सकट घोडे बारा टक्के करून चालावयाचें नाहीं. पाळण्यांतील मूल, व्यवहारांत वागणारा बाप, पुष्कळ वर्षे घालविल्यामुळें अनुभवानें शहाणा झालेला आजा, ह्मणजे अर्थात् लहानांचा उपदेष्टा आणि मदतनीस इतक्यांचें जरी एक कुटुंब होतें तरी त्यांच्यामध्यें अंतर हें आहेच व तसेंच अंतर मानवी कुटुंबांतील निरनिराळ्या वर्गांत असतें. कुटुंब एक याचा अर्थ कांहीं असा नव्हे कीं, लहान मुलानें सल्ला मसलतीचें काम आपल्या डोक्यावर घ्यावें व आजानें पाळण्यांत

निजावें व कसें करावें काय करावें हें नातवांनीं त्यास शिकवावें. ऐक्यभाव ह्मणजे प्रत्येकानें आपापली शक्ति सर्वांच्या हिताकडे लावावयाची व सर्वांच्या हिताकडे आपलें बुद्धिवैभव लावावयाचें. जर एकादा सशक्त असेल तर त्यानें शक्तीचा उपयोग कुटुंबांतील लहान लहान मुलांस उपद्रव देण्याकडे किंवा मारण्याकडे करावयाचा नाहीं. पण त्यांचें संरक्षण करण्याकडे तिचा उपयोग करावयाचा कीं, तेणेंकरून सर्व कुटुंबाच्या उपयोगास ती ती शक्ति यावी. वडील भावाचा धर्म हा आहे कीं, धाकट्यास कोणी उपद्रव करणार नाहीं अशी काळजी घ्यावी; त्याचें संरक्षण होईल असें करावें; व त्यास कांहीं पाहिजे असलें तर मोठ्यांपेक्षां त्यांस तें आधीं मिळावें. आईबाप व वडीलधारी माणसें प्रसंगीं स्वतः उपास काढतात पण मुलाबाळांस अन्न घातल्यावांचून रहात नाहींत. लहान मुलाबाळांना उपास काढावयास लावून देऊन तीं स्वतःची चंगळ उडवीत नाहींत. कारण, ऐक्यभाव ह्मणजे सर्वांच्या हितासाठीं अविभक्तता असणें हें होय. जशी शक्ति जास्त तसें कर्तव्यही मोठें असतें; व जों जों अधिकार ज्यास्त तों तों जबाबदारीही मोठी संभाळावी लागते. आजच्या विषयाचें विवेचन

करण्यास जें साहित्य पाहिजे आहे त्याकरितां आणखी एका गोष्टीचा विचार करावयाचा आहे. ती गोष्ट पुनर्जन्म ही होय. मनुष्यांच्या जीवांची मुदत जर एकदांच असती ह्मणजे एकदांच जन्म व एकदांच मरण त्याला यावयाचें असतें; मनुष्याच्या जीवाचा आरंभ एकाच आईच्या गर्भापासून होऊन श्मशानांतील चितेपर्यंतच जर त्याची मर्यादा असती; मनुष्यांचा जीव जर याच दोन स्थलसीमेंत असता; ह्मणजे जन्मास आलेला प्राणी हा जगांत अगदीं प्रथम उत्पन्न झाला असता व जगांतून एकदा गेला ह्मणजे पुनः कधींही इकडे परत येणारा नसता तर या मानवी आयुष्याचा अर्थच काय आहे हें समजणें कठीण पडलें असतें; व सामाजिक व्यवस्था न्यायाच्या पायावर राहणें शक्यच झालें नसतें. खरी गोष्ट ही आहे कीं पुष्कळ वेळां जन्म घ्यावे लागतात आणि निरनिराळ्या जन्मांत निरनिराळे अनुभव प्राप्त होतात. जसें एकाच आयुष्यांत मनुष्याला, तो मूल असतांना शाळेंत पाठवावें लागतें, नंतर शाळेंतून विद्यालयांत घालावें लागतें व नंतर तो मुत्सद्दीपणाचे कामास योग्य होतो, तसेंच पुनर्जन्माच्या संबंधानें असें आहे कीं ज्याला अगदीं नव्यानें मनुष्यजन्म प्राप्त झालेला

असतो त्याला बहुत मनुष्यजन्मांत अनुभव घेतलेल्यानें शिकविणें, सांभाळ करणें व ओळ लावणें हें त्याच्या हिताचें आहे. कारण, अशा माणसास जगतांतील कठीण कामें झेपावयाचीं नाहींत. ही व्यवस्था अन्यायाची ह्मणणें ह्मणजे मुलास प्रथम शाळेंत घालून क्रमाक्रमानें मुत्सद्दी बनविणें हीही व्यवस्था अन्यायाची ह्मणावी लागेल. पुनर्जन्म ही गोष्ट सत्य आहे; आणि त्याच्याच योगानें समाजव्यवस्था कशी करावी याची किल्ली समजते.

पहिल्यानें आपण जो जातीचा प्रश्न काढिला आहे त्याकडे आतां वळूं. त्यासाठीं प्रथमतः पूर्वेकडील देशांतील पूर्वकालीं जातीचें काय स्वरूप होतें व पश्चिमेकडील वर्गाचें पूर्वकालीं काय स्वरूप होतें; नंतर पूर्वेकडील प्रदेशांत आज मित्तीस जातीचें स्वरूप काय आहे व पश्चिमेकडे आज मित्तीस वर्गाचें स्वरूप काय आहे, याचा विचार करूं. मी कसा विचार करणार याचें धारण आपल्या लक्ष्यांत आलेंच असेल. प्रथमत' मी पूर्वकालच्या जातीचें व वर्गाचें स्वरूप घेतें. ह्मणजे त्यांचा उद्देश काय आहे हें आपणांस कळून येईल. मग आजमित्तीस जातीचें व वर्गाचें स्वरूप काय आहे हें घेईन. तेणेंकरून

निकाल करितां येईल कीं, ज्या उद्देशानें ते अस्तित्वांत आले ते उद्देश त्यांच्याकडून सिद्धीस जात आहेत किंवा नाहींत ? मी जुन्या वर्णव्यवस्थेचा अभिमानी आहें. याविषयीं बोलतांना कालापुरते वरवर पाहणारे जे असतील व आंतील तत्त्व काय आहे त्याचें पूर्ण स्वरूप जे लक्ष्यांत आणीत नसतील त्यांचे कानास माझे शब्द गोड लागणार नाहींत. त्याचप्रमाणें ज्यांस खरें स्वरूप ठाऊक आहे, परंतु आजमित्तीस त्यांच्या संबंधानें ज्या पुष्कळ चुका आतां त्यांत शिरल्या आहेत त्यांविषयीं जे काना-डोळा करितात, अशा लोकांसही वर्णव्यवस्थेच्या सांप्रत स्वरूपा-विषयीं मी जें बोलेन तें गोड लागणार नाहीं. सुधारणा तर झालीच पाहिजे; पण ती प्राचीन पद्धतीवर झाली पाहिजे. जसजसे नवे व्यवहार घडतात तसतसे अनुकूळ फेर-फार त्यांत झाले पाहिजेत. ते चांगले विचार करून झाले पाहिजेत. केवळ जें पाहिलें तें मोडून टाकावें; व ज्यावर दुसरे हल्ला करितात त्याचें कधीं रक्षण ह्मणून करावयाचेंच नाहीं अशा रीतीनें करावयाचे फेरफार उपयोगी नाहींत. पूर्व-काळच्या जातींसंबंधानें मी गल्या वर्षीं यथास्थित विवेचन केलेलें आहे. ह्मणूनविषयास जरूर तेवढेंच मी येथें थोडक्यांत

सांगतें. जुन्या काळच्या हिंदुस्थानांतील जातींचें बीज काय आहे ? विचारी व धार्मिक लोक ह्यांच्या दृष्टीनें जेणेंकरून वर्णव्यवस्थेचें समर्थन करितां येईल असें बीज जुन्या काळच्या हिंदुस्थानांतील जातींमध्यें काय आहे ? जीवाला जेव्हां प्रथमतः मनुष्यजन्म येतो तेव्हां त्यास ज्ञान नसते; अनुभव नसतो व त्यास ओळही नसते. ह्मणून प्रथमतः त्याजवर जें ओझें घालावयाचें तें अगदीं हलकें असलें पाहिजे. त्यापासून ज्या गोष्टींची अपेक्षा करावयाची त्याबद्दलची सक्ती कमी असली पाहिजे. ह्मणून जुन्या पद्धतींतील चातुर्वर्ण्यव्यवस्थेची अगदीं खालची पायरी जी शूद्रजातीची केली आहे तिची मूळ कल्पना अशी होती कीं ज्या जीवांना अजून शिक्षण नाहीं व ज्यांना अजून अनुभव नाहीं, ते जणूं काय शाळेंतील ओनामा शिकावयास या वर्णांत आले आहेत. ज्याप्रमाणें लहान मुलांस आज्ञापालन, नम्रता, सेवा आणि शिक्षण ह्यांच्या योगानें मार्गी लावून दिलेले असतील त्याप्रमाणें या जातीस हे धर्म लाविले, ह्मणजे पुढील आयुष्यक्रमणासाठीं जो अनुभव अवश्य आहे तो त्यास प्राप्त होतो. उदाहरणार्थ, एखादा ब्राह्मणाचा मुलगा घ्या. त्यास गुरुगृहीं पाठविलें ह्मणजे गुरूची

त्यानें सेवा करणें, त्याच्यासाठीं समिधा वगैरे आणणें व त्याचीं गुरें व संभाळणें हा त्याच्या शिक्षणांतील एक भागच होता. त्याप्रमाणेंच समाजरूपी मोठ्या आयुष्यांतील व प्रत्येक जीवाच्या दीर्घ आयुष्यांतील हा शूद्र जन्म झाला. येथें शिक्षणाला नुसता प्रारंभ होतो. ही शाळेंतील अगदीं पहिली इयत्ता आहे. येथें मुलांना थोडाच अभ्यास असतो. अन्नाविषयीं बहुतेक निर्बंध नाहीं. हवें तें त्यांना खावयास अडचण नाहीं. प्रवासाबद्दलही त्यांस निर्बंध नाहीं. त्यांनीं हवें तिकडे जावें. प्रथमारंभींच्या मनुष्यजन्माच्या जीवास शिक्षणाची काच फारशी उपयोगी नाहीं. निर्बंध व अडचणी जोंपर्यंत सहज सोसण्याची त्यांची तयारी नाहीं तोंपर्यंत ते सारे निर्बंध व त्या साऱ्या अडचणी त्यांस एकदम घालतां उपयोगी नाहींत; ह्मणून त्यांना स्वेच्छाचार आहे. त्यांनीं पाहिजे तो धंदा केला तरी चालतो. त्यांनीं हवें तें खावें, हवें तें प्यावें व हवें तिकडे जावें. निर्बंध फारच हलके व अडचणीही लहान लहानच. शाळेंत नुकत्याच घातलेल्या अर्भकाप्रमाणें त्यांची स्थिति आहे. तेथें लहान मुलांवर शिक्षणपद्धतीसंबंधानें करडी नजर नसते. कारण, दाबाची व निर्बंधाची संवय त्यास लागलेली नसते. ह्याप्रमाणेंच या शूद्रवर्णाची स्थिति आहे.

अशा रीतीनें मनुष्याचा जन्म बहुत वेळीं येऊन जीवास शिक्षण मिळाल्यानंतर व त्या जन्मांत प्रारंभीचे धडे चांगले तयार झाल्यानंतर मनुष्यास वरचे जातींत जन्म येतो व तो वैश्यवर्णांत उत्पन्न होतो. या वर्णांत तो गेल्यावर त्याचें कर्म ज्यास्त जोखमीचें होतें व त्याला निर्बंधही ज्यास्त मोठे पाळावे लागतात. कारण, वैश्य हा द्विज आहे. त्यावर संपत्तीची भारी जबाबदारी आहे व तिच्या बरोबर निर्बंधही तसेच ज्यास्त कडक आहेत. वेदाचें श्रवण व अध्ययन करण्याचा अधिकार वैश्यास पूर्वकालीं होता हें विसरतां कामा नये. द्विजचिन्ह यज्ञोपवीत हें तो धारण करितो. या वैश्यजन्मांत राष्ट्राच्या संपत्तीचा खाजिना बाळगण्याचें त्याचें कर्तव्य आहे. ही संपत्ति त्यानें स्वतःसाठीं नव्हे सर्व समाजाच्या उपयोगासाठीं संपादन करावयाची आहे. त्यानें संपत्ति जी मिळवावयाची ती समाजरूपी कुटुंबाचा प्रामाणिक कोठीवाला ह्मणून मिळवावयाची. ती अशा करितां कीं तेणेंकरून विद्येस आश्रय मिळावा, देश श्रीमान् रहावा व जिकडे तिकडे श्रमविभागाची व्यवस्था रहावी; शेतकीवर चांगली देखरेख रहावी आणि स्वदेशांत व परदेशांशीं व्यापार चांगला वाढावा. तात्पर्य, सांपत्तिक स्थितीच्या बाजूनें ज्या ज्या गोष्टींची

समाजरूपी कुटुंबास अवश्यकता आहे त्या त्या गोष्टींची समृद्धि रहावी. देवस्थानें चालविणें, क्षुधितांस जेवूं घालणें, विद्वानांस आश्रय देणें, प्रवाशांसाठीं धर्मशाळा बांधणें, यात्रेकरूंसाठीं विश्रांतिस्थानें व छत्रें घालणें,—अशा करितां कीं आर्यमातेच्या सुव्यवस्थित कुटुंबांत कोणी अन्नावांचून मरूं नये —, विपत्ति नसावी व त्या त्या गोष्टींची वाण पडूं नये ह्मणून हे वैश्यांचे धर्म आहेत. याच धर्माची हल्लींच्या काळीं हिंदुस्थानात फार अवश्यकता आहे.

याही वैश्यवर्णात बहुत जन्म घेतल्यावर तिसऱ्या वर्णांत जीवास जन्म येतो. हा वर्ण ह्मणजे क्षत्रिय वर्ण होय. देशावर अधिकार चालविणें, त्याचें संरक्षण करणें, त्याचें पालन करणें, त्याच्या उपयोगीं पडणें, त्यांत स्वस्थता राखणें व परचक्रापासून त्याचा संभाळ करणें, हा त्या वर्णाचा धर्म आहे. पूर्वकालीं क्षत्रियांचीं कामें फार बिकट होतीं. इतरांप्रमाणें त्यांनाही आपला जीव प्यारा आहे; व इतरांप्रमाणेंच बायकांमुलांवर त्यांची प्रीति असते. पण त्यांच्या धर्माची आज्ञा त्यांस अशी आहे कीं, " समाजाच्या उपयोगीं पडण्यासाठीं व समाजाच्या कल्याणासाठीं तुझें जिणें

आहे; जर कांहीं संकट आलें तर त्याचा आघात शूद्रांवर पडतां कामा नये; वैश्यांवर पडतां कामा नये; ब्राह्मणांवर पडतां कामा नये; त्यांच्या संरक्षणासाठीं तूं बळी पड, व जे लोक तुला राज्यकर्ता व पालनकर्ता मानतात त्यांच्यासाठीं तूं आपल्या जीवाचा बळी दे. " हा क्षत्रिय जीव उत्तरोत्तर सबळ होत चालला असल्यामुळें आयुष्याचा बळी देण्यासही त्याची तयारी असते; व तो सबळ होत जातो ह्मणूनच सामाजिक सेवेसाठीं सिद्ध असतो. जीवावर आस्था ठेवणें ही साधारण मनुष्याची गोष्ट आहे. पण क्षत्रियांच्या हृदयांत तिला थारा नव्हता. कारण, त्याचें जिणेंच देशकल्याणासाठीं होतें; व लोकांवर आघात पडूं नयेत ह्मणून स्वतःच्या रक्ताचा पाण्याप्रमाणें पाट वाहूं देण्यास तो तयार होई.

यानंतर चवथा विभाग येतो; तो गुरूंचा, ज्यांना आपण ब्राह्मण ह्मणतों तो हा विभाग. चोहोंकडून त्यांस कडक निर्बंध आहेत. त्यांचा विषयोपभोगाशीं संबंध ठेविला नाहीं. त्यांनीं ऐहिक संपत्ति साठवावयाची नाहीं. कारण, संपत्ति ही वैश्यांची आहे. स्वतंत्रता मिळविण्यासाठीं भांडावयाचा हक्क त्यांस ठेविला नाहीं. कारण, तो क्षत्रियांचा आहे. हवें तें खावें हवें तिकडे

नावें हवें तें प्यावें अशी सवलत ब्राह्मणांस नाहीं, तो आचार शूद्रांचा आहे. इंद्रियनिग्रह करून आयुष्य घालविणें हें कठीण काम त्यांचें आहे. यामुळें मजा मारणें, ऐषआराम भोगणें, यांशीं त्याचा संबंध नाहीं. आपला देह शुचिर्भूत राखणें हें त्याचें निर्दोष काम आहे तें स्वत:साठीं नाहीं; स्वत:च्या मानासाठीं किंवा महतीसाठीं नाहीं; आपण दुढ्ढाचार्य बनू, आपला वरचष्मा दुसऱ्यावर रहावा ह्मणून नाहीं; लोकांच्या कल्याणासाठीं हा शुचिर्भूतपणा असावा. अशा करितां कीं यांच्या मुखाच्या द्वारानें देवांस समाजांतील लोकांशीं बोलतां यावें. ब्राह्मणांची जिव्हा ह्मणजे धर्मशास्त्र शिकविणारी जिव्हा असावी.

असा हा वर्णव्यवस्थेचा पाया ह्याप्रमाणें आहे. जुन्या वर्णव्यवस्थेची अशीच कल्पना होती. पश्चिमेंतील वर्गाचें विवेचन केल्यावर सदरील व्यवस्थेंत घोंटाळा कसा उत्पन्न झाला आहे व घोंटाळ्यापासून असंतोष व अन्यायबुद्धि कशी उत्पन्न झाली आहे व ती तर आज पुष्कळांच्या मनाशीं खिळून गेली आहे हें कसें तें मी तुह्मांस दाखवीन.

पश्चिमेकडे जे वर्ग पूर्वीं होते त्यांतही अशीच व्यवस्था

लढवय्ये सरदारलोकांच्या छत्राखालीं हा वर्ग हळूं हळूं सबळ होत गेला आणि इंग्लंडच्या शहरांतून ह्या वर्गाची वस्ती फार वाढत गेली. व्यापारासाठीं त्यांनीं गिल्डनांवाच्या संस्था स्थापिल्या. प्रत्येक धंद्यासाठीं त्याच धंद्याचे लोकांच्या मंडळ्या त्यांनीं काढिल्या. यांच्या खालीं शेतकी करणारांचा उत्पादक वर्ग येतो. हे लोक जमिनीशीं खिळलेले असतात. मिरासदाराप्रमाणें त्यांचे हक्क होते व त्यांवर जबाबदाऱ्या होत्या. ज्या सरदारांच्या पोटांतील ते असत त्या सरदारांकडून त्यांचें संरक्षण होई. ह्या व्यवस्थेस फ्यूडल टेन्यूअर असें ह्मणत. जमिनीशीं त्यांचा संबंध इतका दृढ झालेला आहे कीं, इंग्लंडमध्यें आज जरी एखादा मनुष्य उपाशी मरत असला तरी तो कोणत्या गांवचा आहे असा पहिला प्रश्न विचारितात. ह्या प्रश्नाचा अर्थ असा आहे कीं, त्याची जन्मभूमि कोणती ? कोणतें गांव त्याच्या उपजीविकेसाठीं जबाबदार आहे ? उत्तर इंग्लडांत जन्मलेला मनुष्य जर लंडनमध्यें आला व तेथें जर तो उपाशी मरत असेल तर अजूनही अन्नवस्त्रासाठीं ज्या ठिकाणीं त्याचा जन्म झाला आहे तेथें त्यास परत पाठवितात. कारण, ज्या ठिकाणीं तो जन्मास आला तें ठिकाण

त्याच्या पोषणास जबाबदार आहे. ज्या ठिकाणीं तो जन्मास आला तेथून त्यास पोटापाण्यास मिळालें पाहिजे. ही अगदीं जुन्या काळापासून चालत आलेली वहिवाट आहे. तिजला सेटलमेंटचा कायदा असें ह्मणतात. आतां तिकडील व्यवस्था वर्गाविषयीं पहातां त्यांजमध्यें व इकडील व्यवस्थी जात ह्मणजे शिक्षकवर्ग ह्यांच्यांत फरक आहे. इंग्लंडमध्यें उपदेशकवर्ग व राज्यव्यवस्थापक वर्ग ह्यांच्यामध्यें जणूं काय तहनामा झालेला आहे. ह्या दोन्ही वर्गांचा अंमल सारखा विस्तृत आहे. लोकांच्या धर्माच्या बाजूनें जणूं काय उपदेशक वर्गानें राज्यव्यवस्थापक वर्गाशीं सलोखा केलेला आहे. पूर्वेकडील देशांत व पश्चिमेकडील देशांत धर्मबाबींत जो भेद आहे तो असा कीं, पूर्वेकडे मनुष्य-प्राण्याच्या आयुष्यक्रमांतील प्रत्येक भाग धर्मानें व्यापला आहे. पण पश्चिमेकडे साधारण ह्मणजे ऐहिक व्यवहाराच्या आयुष्यक्रमांत तो हमेषा बाहेर असतो; ह्मणजे जणूं काय ऐहिक व्यवहार व धर्म हीं स्वतंत्र असून त्यांच्यामध्यें फक्त तहनामा आहे. अर्थात्, तिकडे उपदेशक वर्ग आणि राज्य-व्यवस्थापक वर्ग ह्यांमध्यें पूर्ण सख्य आहे, परंतु, धर्म सर्व-

गत नाहीं. सर्व इमारत राष्ट्रीय धर्माच्या पायावर बांधलेली नाहीं.

पण, जुन्याकाळीं हे वर्ग खरोखरच अस्तित्वांत होते हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. आज ते नांवाचे आहेत. जेव्हां परदेशाशीं किंवा देशांतल्या देशांत लढाईचे प्रसंग येत तेव्हां आपल्या लोकांस घेऊन समरांगणीं गेला नाहीं असा त्यांवेळीं ड्यूक किंवा बॅरनच नव्हता. ते आपापल्या वर्गाचीं कर्मे करीत असत. अशीच इतर वर्गाची स्थिति होती; ह्मणूनच सर्व समाजाची त्यावेळीं भरभराट होती. सामाजिक संपत्ति होती. रहाणी बहुत प्रकारांनीं जरीं धणधाकटपणाची होती तरी ती अशी होती कीं, कलाकौशल्याचे संबंधानें पाहतां मोठमोठ्या इमारती अस्तित्वांत आल्या; विद्येच्या संबंधानें पाहतां विद्वान् ग्रंथकार निपजले व पुढें मात्र विद्येचा -हास झाला. साधारण सर्व लोकांस अन्नाची, वस्त्राची व आसऱ्याची चांगली समृद्धि होती. आज इंग्लंडात जी उपासमार दृष्टीस पडते, ती त्या देशांतील लोकांवर आलीकडे जी अव्यवस्थेची आपत्ति येऊन पडली आहे तिचा परिणाम आहे. इंग्लंडाला त्यावेळीं आनंदी इंग्लंड असें ह्मणत असत. पण आतां त्याला तसें कोण ह्मणेल ?

असो. आतां सद्य:स्थितीकडे वळूं. सद्य:स्थितींतील पहिला वर्ग आतां घेऊं या. पूर्वकाळच्या वर्णनांत घेतलेल्या अनुक्रमाच्या उलट बाजूनें जाऊं या. इंग्लंडांत अजूनही तसे वर्ग आहेत. अजून इंग्लंडांत राजकुल आहे. सरदारांचीं घराणीं आहेत. नी सरदारी वंशपरंपरेनें चालते. दुसऱ्या कशानें चालत नाहीं. ते वंशपरंपरेच्या हक्कानें राज्यकारभार चालवितात. वंशपरंरच्या हक्कानें ते कायदे करितात. वंशपरंपरेच्या हक्कानें त्यांस पदव्या प्राप्त होतात. डयूक मेला ह्मणजे त्याचा वडील मुलगा ड्यूक होतो. अर्लचा वडील मुलगा अर्ल होतो व ज्यावेळीं त्यास ही पदवी मिळते त्यावेळीं जर तो वयांत आलेला असेल तर तो हौस आफ् लॉर्डसमध्यें जाऊन बसतो व लोकांसाठीं कायदे करितो. सर्व राज्याचा कारभार हें हौस आफ् लॉर्डस्, राजा व हौस ऑफ् कामन्स् यांच्याशीं मिळून, करितें.

ह्या हौस आफ लॉर्डसमध्यें विद्येनें शिरकाव होतो असें नाहीं; शहाणपणानें होतो असें नाहीं; वयानें होतो असें नाहीं व अंगच्या योग्यतेनें होतो असेंही नाहीं. वंशपरंपरेच्या हक्कानें काय तो त्यांत प्रवेश होतो. मग अशा मनुष्याचे अंगीं गुण असोत कीं नसोत. त्याची वर्तणूक कशीही असो. हा वर्ग

नुसता नांवाचा झाला आहे. नांवाचा झाला असें ह्मणण्याचें कारण असें आहे कीं, अशा नांवाच्या वर्गाला जीं कर्तव्य कर्में जोडिलेलीं आहेत तीं आतां तो वर्ग करीत नाहीं. ड्यूक ह्मणजे नायक; पण, लढाईचें संकट आलें असतां समरांगणीं जाण्याचें त्याच्या मनांत येत नाहीं. तो आपल्या ऐवजीं दुसऱ्यास लढाईस जाण्यास मागतो. स्वतः खुशाल घरीं राहतो. ह्याप्रमाणेंच बाकीच्या सरदार मंडळींची स्थिति आहे. नांव राहिलें पण त्याप्रमाणें काम नाहीं. ह्यामुळें असंतोष उत्पन्न झाला आहे. आणि ह्मणून त्यांच्यासंबंधानें कुरकुर आहे. ह्यामुळें चळवळ होऊन "हौस आफ् लॉर्डस बुडवा" अशी ओरड देशांत सुरू झाली आहे. ती कां ? कारण, हौस आफ् लॉर्डस हें नुसतें नांवाचें आहे. त्याची आतां थट्टा झाली आहे. कारण, सरदार ह्मणवितात ते सरदारीचें काम करीत नाहींत. काम न करितां हक्कांचा मात्र उपभोग घेतात आणि ज्या पदव्या आहेत त्यांचा सार्वजनिक सेवेकडे उपयोग न करितां स्वतःच उद्देश सिद्धीस नेण्यास त्यांचा ते उपयोग करितात. परंतु, आज पदव्या मिळविण्याचा इंग्लंडांत ह्याशिवाय आणखी एक मार्ग आहे. तो पैसा हा होय. जर एखाद्या

जवळ पैसा असेल; जर तो लक्षाधीश असेल—तो इतका श्रीमंत असेल कीं, लोक जेव्हां त्याकडे पाहतील तेव्हां तो व त्याच्या अंगचे गुण त्याच्याभोंवतीं सोन्याचा बुरखा असल्या कारणानें त्यांस दिसणार नाहींत. त्यांचे डोळे इतके दिपून जातील कीं त्यांस पाहतां देखील येणार नाहीं——अथवा त्यांच्या नांवावर ब्यांकेंत जर मोठी रक्कम असेल तर मग तो अक्षरशत्रु असला तरी चिंता नाहीं; त्यास अक्कल नसली तरी चालेल; राजकारण काय आहे हें कळलें नाहीं तरी फिकीर नाहीं. त्यानें पार्लमेंटमधील एका पक्षास मदत केली ह्मणजे तो सोन्याचा टाक ठरला. प्रत्येकजण त्याच्या पायां पडेल; त्याला मान देईल व असें झालें ह्मणजे त्यास एखादी पदवीही मिळूं शकेल. पदवी मिळविणें ही गोष्ट फार मोठी आहे. मग त्याबद्दल कांहीं केलें नाहीं तरी चालेल. आपल्याला लॉर्ड ह्मणवून घेणें ही गोष्ट फार मोठी; मग ती आंतल्या गुणांनीं नसेना कां? पैशानें झाली ह्मणजे झालें! ज्याज्याजवळ पुष्कळ पैका असेल तो पार्लमेंटमधील सभासदाच्या निवडणुकीची जेथें मोठी मारामार असेल तेथें त्याच्या खर्चाबद्दल ह्मणून कांहीं रक्कम देतो व ह्या रीतीनें ज्यांचे ह्यातांत त्यावेळीं राज्यसत्ता असेल

त्यांस पाहिजे तसे लोक हौस आफ् कामन्समध्यें आणून त्यांची नोकरी करितो. जाणून बुजून मतें विकत घेणें हें बेकायदेशीर आहे, तरी वस्तुतः तो मतें विकतच घेतो. असें झालें ह्मणजे तो देशाभिमानी ठरला; व तो कोणत्याही रीतीनें अप्रामाणिक किंवा अनीतिमान् नाहीं. असें त्यानें पुष्कळ वेळां केलें, वेळोवेळीं ह्याप्रमाणें हजारों पौंड खर्च केले ह्मणजे त्या पक्षाकडून त्याचे प्रत्युपकार फेडले जावे अशी त्याची योग्यता होते. त्या मनुष्यानें सरकारची मोठी नोकरी बजाविली आहे ह्मणून कायदे करण्याचा वंशपरंपरचा हक्क त्यास दिला पाहिजे. त्यानें इतके पैसे खर्च केले ह्मणून सरदार लोकांच्या कौन्सिलांत बसून सर्व राज्याकरितां कायदे करण्याच्या हक्काचें बक्षीस त्यास दिलें पाहिजे. अशा रीतीनें पदव्या मिळविण्याचा आजकाल मार्ग आहे. अमेरिकेंत व आस्ट्रेलियांत तर या उघड उघड द्रव्यपूजेची नग्नता झांकण्यास त्यांस मानाचें हें लहानसें आच्छादनही नाहीं. लोकांत मान व सत्ता मिळविण्याची मालकी कायती पैशासच आहे. अमेरिकेंत एक मनुष्य होऊन गेला; त्याप्रमाणें माणसें असतात. ह्या मनुष्याची दवलत लाखोंगणती डालर होती. त्यानें इतकी संपत्ति कशी मिळविली

ह्मणाल तर त्यानें रेलवेबद्दल अशा बातम्या पसरल्या कीं, तेणें-करून त्यांच्या शेअरांचा भाव अगदीं उतरून गेला. ह्याचें नांव मोडकळीस आणणें. पुढें ही मिळकत बाजारांत बहुतेक कुचकिमतीची झाल्यावर त्यानें विकत घेतली, व आपल्या हातांत आल्यावर त्या शेअरांचा भाव वाढविला. ज्यासाठीं त्यानें फारच थोडा मोबदला दिला त्यावर त्यानें फार पैसा मिळविला. स्टॉक एक्सचेंज व त्यावरील सट्टे हें तुह्मांस ऐकून ठाऊक असेलच. त्यांतील मोठें गूढ असें आहे कीं, दुस-ऱ्याच्या पूर्वीं बातमी मिळवावी. आपल्याला मिळालेली बातमी त्यांस कळवूं नये. आपल्याजवळ असलेली ठेव जर त्या बातमीनें कवडीमोल होत असेल तर सर्व लोकांस ही बातमी कळण्यापूर्वीं तुमची ठेव कवडी मोल झाली हें इतरांस कळ-ण्यापूर्वीं त्यास विकून टाकावी ह्मणजे त्याची पिशवी रिती व तुमची भरलेली. असें तुह्मीं पुष्कळ वेळां केलें ह्मणजे तुह्मी श्रीमंत व्हाल. तुह्मी यशस्वी आहां असें पश्चिम गोलार्धांत प्रत्येकजण तुह्मांस ह्मणेल. तुमच्या जातभाईनीं तुमचा कित्ता घ्यावा असें तुह्मांस ते मानूं लागतील. मी लंडनच्या स्कूल-बोर्डांत होतें हें तुह्मांस ठाऊकच आहे. मुलांना जीं पुस्तकें

बक्षीस देत तीं मला पहावयास सांपडत. त्यांत मार्ग होऊन गेलेल्या पुरुषांच्या गोष्टी असत. हे मनुष्य कोण ह्मणाल तर ते सहा पेन्स ह्मणजे दोन चार आणे घेऊन बाहेर पडलेले व एवढ्या पैशानें हे मुलगे एखाद्या शहराला आलेले; नंतर ते मोठे उद्योगी, फार काटकसरीनें वागणारे, फार जपून असणारे व अमुक गोष्ट बरी वाईट याचा फारसा विचार न करणारे असें असावयाचे. अशा त्यांच्या क्रमानें त्यांस पैशावर पैसा मिळत जावयाचा. बॅकेंत त्यांचे लाखों रुपये पडावयाचे. पुढें त्यांनीं एक दोन देवळें बांधावयाचीं. ते मेल्यावर एखाद्या चव्हाट्यावर त्यांचा पुतळा करून ठेवावयाचा. असें झालें ह्मणजे मुलांच्या पुढें यशस्वी पुरुष ह्मणून त्यांचा कित्ता मांडावयाचा. परंतु, हे कोण ? तर बहुत प्रसंगीं स्वजातीयांचा नाश करून आपण पैसा मिळविलेले. याचा परिणाम काय होतो ? परिणाम असंतोष, कलह, मोलमजूरी करणाऱ्यांचा समाज असंतुष्ट व राज्यक्रांतीची भीति घालणारा. मोलमजूरी करणाऱ्यांचा समूह असें ह्मणतो कीं, जे, आमच्यापेक्षां नीतिमान् नाहींत, जे आह्मांपेक्षां यत्किंचितूही विद्वान् नाहींत व आह्मांपेक्षां यत्किंचितूही जे शहाणे नाहींत

त्यांनीं इतके श्रीमान् कां असावें ? व आह्मीं असें दारिद्र्यग्रस्त गरीब कां असावें? " पैसेवाल्याला बाह्यदृष्टीनें लोक कितीही नमून असोत व त्यास मान देवोत तरी त्याजविषयीं अंतःकरणांत त्यांस पूज्यबुद्धि वाटत नाहीं. दुसरा मनुष्य आपल्यापेक्षां श्रीमंत आहे तेवढ्याच कारणानें आपण त्यापेक्षां खालच्या दर्जाचे आहोंत असें कोणी समजत नाहीं. मान मिळण्याची मालकी जेथें पैशास असते; तेथें कलह, असंतोष व धमकी असावयाचीच; कारण, शहाणपणासंबंधानें जो मान असतो त्यांत मत्सर नसतो. पण, संपत्तीच्या कारणानें मान देणें ह्मणजे लोकांत कलह माजविणें आहे अथवा त्यामुळें लोकांतील मोठ्या समूहांत सतत वृद्धिंगत होणारा असंतोष उत्पन्न करणें आहे.

आतां पूर्वेकडे मी वळतें. आजामित्तीला इकडे जातिभेद कसा आहे हें घेऊं. जें अंतर पडलें आहे तें कसें पडलें ? हिंदुधर्माविषयीं आपला विश्वास कितीही दृढ असला तरी हें उघड आहे व आपण सर्व जाणत आहोंत कीं, पूर्वकाळची चातुर्वर्ण्यव्यवस्था आपणांत नाहीं. शास्त्राच्या कसोटीस लावून पाहिलें व स्मृतिकारांच्या कसोटीस लावून पाहिलें ह्मणजे

आपणांस असें दिसून येईल कीं, पश्चिमेकडील सरदारांच्या पदव्या जशा नांवाच्या झाल्या आहेत, त्याचप्रमाणें पूर्वेकडील चातुर्वर्ण्य आलीकडे नांवाचें झालें आहे हें असें कसें झालें ? चातुर्वर्ण्य ह्मणजे चार जाति. ह्यांनीं आपला धर्म, आपलें स्वरूप व आपलें कर्म विसरल्यामुळें हें घडून आलें. शेंकडों हजारों वर्षें हळूं हळूं फरक पडून जातींचें कर्म जाति विसरल्या आहेत. ब्राह्मण, अधिकार व संपत्ति मिळविण्याच्या नादीं लागले. ब्राह्मणांचें उपदेशकाचें कर्म क्षत्रिय करूं पहात आहेत. वैश्य आपलें कर्म विसरलें; ते क्षत्रियांचें करूं पहात आहेत. शूद्र द्विजजातीयांचें कर्म करण्याचा अधिकार सांगत आहेत. कोणीही स्वकर्म करण्यांत संतुष्ट नाहीं. प्रत्येक जात दुसऱ्याचें कर्म करण्याचा अधिकार सांगत आहे. असा हा प्रकार शेंकडों हजारों वर्षें चालला आहे; ह्मणून बांधवहो, मी तुह्मांस ह्मणतें; तुमच्या तोंडावर तुह्मांस उघड सांगण्याचा मला हक्क आहे. कारण, पश्चिमेकडे मी तुमचा पक्ष घेतें व जेथें जेथें तुमच्यावर हल्ला होतो तेथें तेथें मी तुमची बाजू संभाळतें. तुमच्या तोंडावर मला सांगण्याचा हक्क आहे कीं, जी सर्वांत मोठ्या मनाची असली पाहिजे, जी सर्वांत उच्च असली पाहिजे व जी

सर्वांत शुद्ध असली पाहिजे अशी जी ब्राह्मण जात तिनें ही निकृष्टावस्था आणण्याला आरंभ केला. तिला जेव्हां पैशाची हांव सुटली; अधिकाराची लालसा उत्पन्न झाली; जेव्हां वैश्यांची संपत्ति तिनें घेतली; क्षत्रियांचा राज्यकर्तेपणा घेतला; आपलें आध्यात्मिक ज्ञान तीस पसंत पडेनासें झालें आणि आपल्या धर्माधिकारानें संतोष राहीनासा झाला; ज्याप्रमाणें आपली धर्मपत्नी टाकून मनुष्य दुसऱ्या स्त्रीवर आसक्त होतो, त्याप्रमाणें ब्राह्मणानें आपली आत्मिक ज्ञानरूपी स्त्री टाकून दिली व संपत्ति, द्रव्य व ऐहिकवैभवरूपीं एतद्रूप स्त्रीवर त्याचें मन जडलें आणि ह्या आत्मिक व्यभिचारानें वर्णसंकर झाला. हा वर्णसंकर झाल्यावर अर्जुनानें भविष्य केल्याप्रमाणें लोकांस उतरतीकळा लागली; व एकंदरींत सर्व सामाजिक आयुष्यास उतरती कळा लागली. ह्याप्रमाणें एकीकडे ही आध्यात्मिक निकृष्टावस्था होऊन दुसरीकडे ब्राह्मणवर्णाचे धर्म न घडतां ब्राह्मणवर्णाचे हक्क मात्र उपभोगिले जात आहेत. ब्राह्मणवर्ण गुरुत्वाची हयगय करीत आहे व ज्ञान त्यानें मुळींच गमाविलें आहे. अशा स्थितींत पूर्वी लोकांच्या गुरुत्वाचें काम जेव्हां ब्राह्मणवर्ण करीत होता, तेव्हांचे हक्क त्यास कसे मागतां येतील ? बाह्य आकार राहून आंतील

सत्य नाहींसें झाल्यामुळें वाईट परिणाम झाला आहे. त्याच्या योगानें ढोंग, लबाडी व अभिमान हीं आंत शिरून ब्राह्मणेतरांसंबंधानें तिरस्कार बुद्धीनें पाहण्याकडे ब्राह्मणांचा कल झाला आहे. लोकांस ब्राह्मणांसंबंधानें तिटकारा आला आहे. ब्राह्मणत्वाचें कर्तव्य न करितां ब्राह्मणत्वाच्या हक्कांस मात्र चिकटून राहिल्यानें मत्सर, राग, असंतोष व फूट हीं समाजांत उत्पन्न झालीं आहेत. असें नसतें तर त्या ठिकाणीं शांतता, प्रीति व व्यवस्थित प्रगति असावयाची. कारण, हें लक्ष्यांत ठेवा कीं, जेह्वां वर्णसंकर होतो, तेह्वां ब्राह्मण अध्यात्मज्ञान सोडून पक्ष माजवूं लागतात; जेह्वां अध्यात्मज्ञान सोडून संपत्तीसाठीं झगडूं लागतात, तेह्वां ब्राह्मणधर्माचा भंग होतो व धर्मशील ब्राह्मणजन्माचें सार्थक होत नाहीं. कारण, ब्राह्मण ह्मणजे केवळ स्थूलशरीर नाहीं. जीव होय. ब्राह्मण हा ब्राह्मणाच्या पोटीं आला येवढ्यावरूनच त्याचें ब्राह्मणत्व पूर्ण होत नाहीं. ब्राह्मणाचा वर्तनक्रम सर्व आयुष्यभर चालला पाहिजे. ब्राह्मणत्व जर पालन झालें नाहीं तर ज्या जीवास ब्राह्मण जन्म घ्यावयाचा आहे त्यानें करावें तरी काय ? अशा मातापितरांच्या कुलांत त्यास यावयाचें आहे कीं, जेथें आध्या-

त्मिक आयुष्यक्रम अशा रीतीनें पूर्णतेस येईल कीं, सर्व मनुष्यांस कित्ता मिळेल. अशा जीवानें करावें काय ? अशी कल्पना करा कीं, एक ब्राह्मणाचा जीव फार उच्च पदास जाऊन पोंचलेला असा पुनः जन्मास येण्याच्या तयारींत आहे. तो हिंदुस्थानांत येऊन ब्राह्मणाचें कुटुंब सोधूं लागल्यास जर असें आढळून आलें कीं, ब्राह्मणांना संस्कृत येत नाहीं; वेद येत नाहीं व शास्त्राचा खरा अर्थ कळत नाहीं; तात्पर्य, वरपांगीं मात्र ब्राह्मण, अंतर्यामीं ब्राह्मण मुळींच नाहीं. आणखी अशी कल्पना करा कीं, अंतर्याम ब्राह्मणाचें आहे; पण जात मात्र ब्राह्मणाची नाहीं फार कशाला, हिंदुचतुर्वर्णांच्या बाहेरील जात आहे. अशी कल्पना करा कीं, एक शूद्राचें कुटुंब आहे; त्यांतील स्त्रीपुरुषें सात्विक आहेत; धार्मिक आहेत; आपल्या धर्माप्रमाणें चालण्यास अगदीं तत्पर आहेत; तीं उत्तम शुचिर्भूतपणानें व उपयुक्त काळ घालवितात. अशा स्थितींत असें होऊं शकेल कीं, पुनः जन्मास येणारा जो हा ब्राह्मणजीव तो आध्यात्मिक निकृष्टावस्था येण्यापेक्षां निकृष्ट स्थूल शरीर घेण्याचें पत्करून अशा शूद्र मातापितरांचे पोटीं जन्म घेईल. कारण, खरोखर ब्राह्मणत्व कशांत ? बाह्यतः स्थूल ब्राह्मणशरीरांत किंवा ब्राह्मण-

आत्म्यांत ? एक आहे व एक नाहीं तर खरोखर ब्राह्मणत्व होईल काय ? खरी पंचाईत जी आहे ती येथेंच. ब्राह्मणाचे जीवास ब्राह्मणशरीर मिळाल्याशिवाय व ब्राह्मणशरीरास ब्राह्मण जीव मिळाल्याशिवाय कोणीही मनुष्य पूर्ण ब्राह्मण होत नाहीं. तुह्मांला असें वाटतें काय कीं, ज्याच्याविषयीं मला पुरावा देतां येणार नाहीं असें मी बोलत आहें. ब्राह्मणवर्णासंबंधानें बोलत असतां त्या महान् स्मृतिकारानें काय ह्मटलें आहे ? सद्विद्या आपण होऊन ब्राह्मणाकडे आली व त्याचे स्वाधीन झाली व ह्मणाली, हेंच तुझें धन. या धनास डाग लागूं नये

---

१ उत्पत्तिरेव विप्रस्य मूर्तिर्धर्मस्य शाश्वती । स हि धर्मार्थमुत्पन्नो ब्रह्मभूयाय कल्पते ॥ ९८ ॥ ब्राह्मणो जायमानो हि पृथिव्यामधिजायते। ईश्वरः सर्वभूतानां धर्मकोशस्य गुप्तये ॥ ९९ ॥ मनुस्मृतिः ॥ भाषांतरः– ब्राह्मणदेहाची उत्पत्ति हें धर्माचें शाश्वतशरीर आहे. तस्मात्, ज्याअर्थीं **ब्राह्मण, धर्माकरितां उत्पन्न झाला आहे** त्याअर्थीं धर्मानें संपादन केलेल्या आत्मज्ञानानेंच तो मोक्षाचा अधिकारी होतो ९८. पृथ्वीवर उत्पन्न होणारा ब्राह्मण **धर्मकोशाच्या रक्षणार्थ** सर्व प्राण्यांचा प्रभु ह्मणून उत्पन्न होतो ९९. मो० क०

अथवा कलंक लागूं नये असें याचें रक्षण कर. पुढें मनु

१ विद्या ब्राह्मणमेत्याह शेवधिस्तेस्मि रक्ष माम् । असूयकाय मां मा दास्तथा स्यां वीर्यवत्तमा ॥११४॥ म० अ० २ ॥ भाषांतरः–विद्याधिष्ठात्री देवता ब्राह्मणाकडे येऊन ह्मणाली " मी तुझें द्रव्यभांडार आहे; माझें रक्षण कर. हेवा करणाऱ्याचे स्वाधीन तूं मला करूं नकोस. ह्मणजे मी वीर्ययुक्त होईन११४.विद्या ह वै ब्राह्मणमाजगाम तवाहमस्मि त्वं मां पालयानर्हते मानिने नैव मादा गोपाय मां श्रेयसी तथाहमस्मि॥ छांदोग्यब्राह्मणम् ॥ भाषांतरः–विद्याधिष्ठात्री देवता ब्राह्मणाकडे आली आणि ह्मणाली "मी तुझी आहे तूं माझें रक्षण कर. अयोग्य व अभिमानी शिष्याला तूं मला मुळींच कधींही देऊं नको. अशा रीतीनें माझें रक्षण कर. ह्मणजे मी तुझें कल्याण करण्यास समर्थ होईन. धर्मार्थौ यत्र न स्यातां शुश्रूषा वापि तद्विधा । तत्र विद्या न वप्तव्या शुभं बीजमिवोषरे ॥११२॥ विद्ययैव समं कामं मर्तव्यं ब्रह्मवादिना । आपद्यपि हि घोरायां न त्वेनामिरिणे वपेत् ॥ ११३ ॥ उत्कृष्ट बीज ज्याप्रमाणें पीक न येणाऱ्या माळ जमिनींत पेरीत नाहींत त्याप्रमाणें धर्म, अर्थ अथवा अध्ययनाला अनुरूप अशी शुश्रूषा ज्याच्या ठिकाणीं नाहीं त्याला विद्या सांगूं नये ११२. वेदाध्यापकाला विद्येसहवर्तमान मरण्याचा प्रसंग आला तरी चिंता नाहीं. परंतु, घोर आपत्ति जरी प्राप्त झाली तरी ज्याच्या ठिकाणीं विद्येचा कांहीं उपयोग होणार नाहीं त्याला विद्या सांगूं नये ११३. विद्यया सार्धं म्रियेत न विद्यामूषरे वपेत् ॥ छांदोग्य-

[ पुढें चालू. ]

आणखी असें ह्मणतो कीं, ज्याप्रमाणें लांकडाचा हत्ती, कातड्याचा हरीण, त्याप्रमाणें विद्याहीन ब्राह्मण होय. तिघांचीं नावें अयथार्थ आहेत. त्याला वेद आला पाहिजे ह्मणजे तो दुसऱ्यास शिकवील. त्याला वेद कळला पाहिजे ह्मणजे तो दुसऱ्यास समजून देईल. ब्राह्मणजन्मांत येऊन ज्याची ब्राह्मण धर्माप्रमाणें वागणूक नाहीं तो लांकडाच्या हत्तीप्रमाणें व कातड्याच्या हरिणाप्रमाणें ह्मणजे दिसण्यांत मात्र सुंदर परंतु, जगाच्या कोणत्याही उपयोगाचा नाहीं. आतां अशी कल्पना करा

---

[ मागील पृष्टांवरून समाप्त ]

ब्राह्मण ॥ विद्येसहवर्तमान मरूनही जावें ( ह्मणजे आपल्या मरणाबरोबर विद्या नाहींशीं होण्याचा प्रसंग आला तरी चिंता नाहीं. ) परंतु तिला खडकाळ जमिनीवर पेरण्याच्या भरीस पडूं नये. यमेव तु शुचिं विद्यान्नियतं ब्रह्मचारिणम् । तस्मै मां ब्रूहि विप्राय निधिपायाप्रमादिने ॥ ११५ ॥ म० अ० २॥ जो शिष्य तुला जितेंद्रिय, ब्रह्मचारी व आचरणानें शुद्ध आढळेल आणि हलगर्जीपणा न करितां तो जर विद्यारूप द्रव्य भांडाराचें रक्षण करण्याजोगा असेल तर त्या ब्राह्मणाला तूं विद्या सांग. मो० क०.

१ यथा काष्ठमयो हस्ती यथा चर्ममयो मृगः । यश्च विप्रोनधीयानस्त्रयस्ते नाम बिभ्रति ॥ १५७ ॥ म० अ० २॥ मो० क०

कीं, देह ब्राह्मणाचा; पण आंत शूद्र जीव. तो आपणांस ओळखितां कसा येईल ? जीं जिन्हें दिसतात त्यांवरून; त्याच्या क्षुद्रवासना व क्षुद्र महत्वाकांक्षा ह्यांवरून तो ओळखितां येईल. ब्राह्मणदेहाचा वैश्याचा जीव आपणांस ओळखितां येईल. पुष्कळ सोनें पाहिजे; श्रीमान् व्हावयास पाहिजे; मोठें घर पाहिजे; मौल्यवान् वस्तु पाहिजेत वगैरे प्रकारच्या वासना ज्याचे ठिकाणीं आहेत तो जीव वैश्य समजावा. त्यानें यज्ञोपवीत[1] जरी धारण केलें असलें तरी वैश्याचा आत्मा त्यांत आहे. स्मृतीप्रमाणें तो ब्राह्मण नाहीं. ब्राह्मणवर्णांत त्यांस स्थल नाहीं. त्याप्रमाणेंच शूद्र देहांतील जीव शुद्ध, खरा व उत्तम असेल पण त्यांत जर शांति व सहनशीलता नसेल आणि भोंवतालच्या बहुत ब्राह्मणांपेक्षां त्याचें वर्तन पवित्र असून आपणास ब्राह्मणाचे अधिकार नाहींत असें पाहून जर तो शूद्र असें ह्मणेल कीं " ही वर्णव्यवस्था मूर्खपणाची आहे ;

---

१ ह्या लिहिण्यावरून वैश्याला यज्ञोपवीतधारण नाहीं असा ह्या बाईचा समज झाला आहेसा दिसतो. परंतु, कार्पासमुपवीतं स्याद्विप्रस्योर्ध्ववृतं त्रिवृत् । शणसूत्रमयं राज्ञो वैश्यस्याविकसौत्रिकम् ॥ ( ४४॥ अ० २ ) ह्या मनुवचनांत वैश्याला यज्ञोपवीतधारण उक्त आहे. मो० क०

जातिबंधनांत कांहीं अर्थ नाहीं. जात नाहींशीच केली पाहिजे. वर्तनक्रमावरून वर्णव्यवस्था न्याय्य नाहीं आणि मला अन्याय होत आहे. ह्मणून ही तोडून मोडून टाकून या चावटगिरींतून मोकळा होण्यासाठीं माझ्या हांतून जें होईल तें मी करण्याविषयीं प्रयत्न करीन " तर त्यांत नवल तें काय ?

ब्राह्मणत्व खरें आहे असा माझा भरंवसा आहे. खरोखर ब्राह्मणवर्ण ही सत्यता आहे, हें मी जाणतें. आज मानवी आयुष्यांत ती जागृत शक्ति आहे असें मला ठाऊक आहे. खऱ्या ब्राह्मणास मी पूज्य मानितें. ह्मणून तुह्मांस असें सांगतें कीं आज माझ्या भोंवतीं जे नांवाचे बहुत ब्राह्मण दृष्टीस पडत आहेत त्यांजकडे पाहून मला दुःखाचा उमाळा येतो व लाज वाटते. कारण, स्मृतींत असें सांगितलें आहे कीं[1] ज्यांस शिकवितां येत नाहीं ते ब्राह्मण नाहींत. ज्याला ज्ञान आहे तो जरी अगदीं मूल असला तरी केंस पिकलेल्या अज्ञानी मनुष्यापेक्षां तो वृद्ध आहे. ज्याला पवित्र वेदविद्या येत

१ न हायनैर्न पलितैर्न वित्तेन न बन्धुभिः । ऋषयश्चक्रिरे धर्मं

[ पुढें चालूं. ]

नाहीं असा केंस पिकलेला जरी एखादा ब्राह्मण मला भेटला व मला आज जें येत आहे त्यापेक्षां त्याला फार कमी शिकवितां येईल असें पाहिल्यावरून जर मीं ह्मटलें कीं कांहींकांनीं तरी खऱ्या ब्राह्मणत्वाचें वर्तन केलें पाहिजे कीं तेणेंकरून पुढें चांगले दिवस येतील. तेथपर्यंत ही जाती जीवंत रहावी व पारमार्थिक संजीवन ज्यांत पुढें ओततां येईल अशीं पात्रें ह्मणून हिचा उपयोग व्हावा.

---

[ मागील पृष्ठावरून समाप्त ]

योनूचानः स नो महान् ।। १५४ विप्राणां ज्ञानतो ज्यैष्ठ्यं क्षत्रियाणां तु वीर्यतः । वैश्यानां धान्यधनतः शूद्राणामेव जन्मतः ॥ १५५ ॥ न तेन वृद्धो भवति येनास्य पलितं शिरः । यो वै युवाप्यधीयानस्तं देवाः स्थविरं विदुः ॥ १५६ ॥ म० अ० २॥ भाषांतरः—पुष्कळ वर्षें, पिकलेले केंस, द्रव्य आणि वडीलपणाचें नातें ह्या सर्वांमुळेंही महत्त्व प्राप्त होत नाहीं. " सांग वेदाध्ययन करणारा जो असेल तोच खरोखर आह्मांला मोठा " असा धर्म ऋषींनीं ठरविला आहे १५४. विद्येमुळें ब्राह्मणाला श्रेष्ठत्व प्राप्त होतें; वीर्यामुळें क्षत्रियांना महत्त्व प्राप्त होतें; वैश्यांना धनधान्यांमुळें श्रेष्ठपणा येतो ; आणि शूद्रांना मात्र वृद्धपणामुळें मोठेंपणा मिळतो १५५. केंस पिकल्यानें वृद्धत्व येत नाहीं. अल्पवयीं असूनही जो विद्वान् असेल त्याला देव वृद्ध ह्मणतात १५६.

जातींसंबंधानें आणखी एक मुद्दा आहे. आतांप्रमाणें जातिनिर्बंध पूर्व काळीं कडक नव्हते. उच्चवर्णाचे गुण जर खालच्या वर्णाच्या मनुष्याच्या अंगांत दिसून आले तर त्यास उच्चवर्णांत जातां येत असे*. वाईट कर्माच्या योगानें ब्राह्मणास जर शूद्रयोनींत जन्म आला व त्यांत राहून ब्राह्मणाचे गुण त्याचे हातून घडूं लागले तर तो ब्राह्मणवर्णांत जाऊं शके. तेव्हां ब्राह्मणत्व खरं होतें. शरीर व बाह्यक्रिया येवढ्यांवरच तेव्हां ब्राह्मणत्व नव्हते; आणि अशीं उदाहरणें तुह्मांस शास्त्रांत आढळतात कीं जरी कोणी बाह्यस्वरूपावरून जातिहीन असला अथवा ज्या कोणाच्या आईबापांचा किंवा कुलाचा पत्ता नगला तरी अशा मुलाचे अंगीं ब्राह्मणाचे गुण असले, तर ज्यांच्या योगें त्यांची अंतःशुद्धि व बहिःशुद्धि होईल असे आवश्यक संस्कार करून पूर्वींचे महर्षि त्यास ब्राह्मणांत घेत. ह्मणून त्यावेळीं असंतोष नव्हता; अन्याय झाला

---

* अनीबिझांट बाईचें ह्मणणें काय आहे हें मूळ मतलबांत फेरबदल न करितां भाषांतरकर्त्यांनीं दिलेलें आहे. वर्णव्यवस्था उत्पत्ति सिद्ध आहे ह्या निबंधाकडे लक्ष्य दिलें असतां नुसत्या विधानावरून हें प्रतिपादन लोकांना मान्य होईलच असें दिसत नाहीं. मो० क०

असें कोणास वाटत नसे व त्याचे अंगीं तसे चांगले गुण असले तर अधिकारापेक्षां खालच्याला स्थानीं आपल्या ठविलें असा विषाद त्याला अंतर्यामीं वाटत नसे केव्हांही द्वार खुलें होतें. त्यांतून जीवास स्थूलशरीरकोशासह जातां येत असे. तात्पर्य, देहाची खऱ्या आयुष्यक्रमासंबंधानें मातब्बरी गौण होती. पण हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं आहारविहारांसंबंधानें जे निर्बंध आहेत त्यांत खरोखर नैसर्गिक सत्य आहे. कोणत्या अन्नापासून कोणते परिणाम होतात हें महत्त्वाचें आहे. जें अन्न पोटांत जातें तेणेंकरून जीवाच्या क्रियेचें साधन होण्यास तें उपयोगीं पडतें. आयुष्यामध्यें जीवास जीं निरनिराळी कामें करावयाचीं असतात त्यांस अनुकूल अशीं निरनिराळ्या गुणांचीं अन्नें असतात. एकापात्रांतून खाणें न खाणें इत्यादि जे निर्बंध आहेत ते खरोखरच महत्त्वाच असून त्यांत सत्यता आहे. परंतु, सांप्रतकालच्या समाजांत त्या निर्बंधांचें खरें स्वरूप नाहींसे होऊन नुसतीं बाह्य बुजगावणीं झालीं आहेत. कारण, शरीरांत शुद्ध रस उत्पन्न करणारें सोंवळें मुख्यत्वें अंतःशुद्धीवर अवलंबून आहे. जो असत्य बोलतो, असत्यावर प्रीति करितो अथवा नित्य क्रमांत पाप करितो त्याजमध्यें

असे शुद्धरस उत्पन्न होऊं शकत नाहींत. मनुष्य हलक्या जातीचा असून त्याचें अंतःकरण शुद्ध असेल तर त्याच्या हातचें अन्न मी खाईन. परंतु, ज्यावर शुद्धतेचा आळ आला आहे, जो वासनांनीं भ्रष्ट झाला आहे व नित्य कमांत सत्य व सत्त्वशुद्धि हीं ज्याच्यांत नाहींत अशाच्या हातचें अन्न मी घेणार नाहीं. या सर्वांचा विचार केला पाहिजे. माझी विचारसरणी आपल्या लक्ष्यांत आली असेल. आहे हें बुडवुन टाकावयाचें नाहीं; पण त्यांतील सत्यता गेली आहे ती आणावयाची. तें नाहींसें करावयाचें असें नाहीं; पण तें सुधारावयाचें. असें केलें ह्मणजे अन्न व बाह्य विधि ह्यांविषयीं मात्र ब्राह्मणाचे आचार बाळगणारे असे ब्राह्मण नव्हेत; तर पूर्वकाळीं ज्याप्रमाणें ब्राह्मण होते त्याप्रमाणें आयुष्यवर्तन ज्यांचें आहे असे ब्राह्मण असावे. ह्मणजे त्यांच्या पोटीं उच्च पदास जाणाऱ्या जीवास जन्म घेतां येईल.

असें मी बोलतें. कारण, ही पवित्र भूमि मी आपलें घर करण्यास आलें आहें व धर्मकर्मानें मी ज्यांची आहें त्या तुह्मांस मी हळूं हळूं असें दाखविण्याचा यत्न करणार आहे कीं, हिंदुस्थानचा तरणोपाय अमुक अमुक मार्गानें गेलें

असतां जर होणें असेल तर सुधारणा केल्या पाहिजेत. या गोष्टींचा तुम्ही आपसांत विचार करा. मी तुह्मांपुढें आराखडा व तत्त्वे मांडिलीं आहेत. तुमच्यांतील कांहीं धर्मशील व सात्विक पुरुषांच्या सल्ल्यानें गोष्टीस खरेपणा कसा आणितां येईल व ज्या आध्यात्मिक आयुष्यक्रमाचा लोप झाल्यामुळें आपणांस निकृष्टावस्था आली आहे व आत्मिक आयुष्य नाहीं ह्मणून सर्व जग ज्यासाठीं हाका मारीत आहे तें कसें आणितां येईल याचा विचार ठरवूं अशी मला आशा आहे. पाश्चिमात्य देशाची मला माहिती आहे. मी आजपर्यंत तेथें राहिलें. त्यांना कशीं दुःखें भोगावीं लागत आहेत व ही स्थिति त्यांस कोणत्या कारणानें प्राप्त झाली आहे तीं कारणें मला ठाऊक आहेत. तेथील विपत्ति, दारिद्र्य व निकृष्टावस्था हीं मला ठाऊक आहेत. तेथील विपन्न स्थिति व कलह मला ठाऊक आहेत. हें शिकण्यासाठींच मी तिकडे गेलें होतें व मीं ओळीनें सर्व धडे शिकलें आहे. मी तिकडे कशाकरितां गेलें ? मी तिकडे जाऊन जन्म घेण्याचें कारण काय ह्मणाल तर जो देह हल्लीं मीं धारण केला आहे त्या देहाच्या द्वारानें तिकडील सुधारणेपासून ज्या गोष्टी

शिकावयाच्या त्या अनुभवानें मी शिकल्यें. त्या देशांत विपत्ति व कलह कसे आहेत हें मी शिकल्यें. अशाकरितां कीं त्यांचा उपयोग व्हावा व अशा रूपानें ज्ञानाचा संचार करून पुनः मी त्या ज्ञानासह आपल्या लोकांकडे परत येऊन त्यांस जागे करावें. कारण, ज्या सुधारणेविरुद्ध ही वाचा बोलत आहे आणि ज्या विपत्ति हा देह जाणत आहे ती वाचा व तो देह तिकडे उत्पन्न झाला नसता तर हें बोलणें तुह्मीं ऐकलें नसतें. कारण, आपल्या सुधारणेच्या चमकण्यानें त्यांना मला अंध करितां येणार नाहीं. बाह्य देखाव्याच्या वैभवानें त्यांस माझे डोळे दिपवितां येणार नाहींत. कारण, त्या सुधारणेंतील विपत्ति व दुर्वृत्तता मीं स्वतः जाऊन पाहिली आहे. तींतील मूर्खपणा मला ठाऊक आहे. मी त्या सुधारणेंत राहिलें आहे. मला त्या सुधारणेची संपत्ति ठाऊक आहे. तींतील ऐषआराम व ज्यांच्या पाठीमागें तुह्मी लागला आहांत आणि ज्याच्या चकाकण्यानें तुमच्यांतील तरुण पुरुष भुलून गेले आहेत तें सर्व मला माहीत आहे. तिकडूनच मी परत इकडे येऊन तुह्मांस असें सांगतें कीं त्यांत अर्थ नाहीं. ती नुसती भुरळ आहे. त्यांत निकृष्टावस्था आहे; उन्नति नाहीं. त्याचा अर्थ

आत्मिक मरण आहे; संजीवन नाहीं. त्यांचें उदाहरण पाहून आपण जागें व्हावें. तिकडील अनुभव पाहून तिकडील चुका आपण करूं नयेत. आपण एका जुटीनें यत्न करूं या. फक्त एका जातीनें नव्हे तर जी पूर्वी चातुर्वर्ण्यव्यवस्था होती त्यांतील सर्व ह्मणून यत्न करूं या. तर मग सर्वांच्या कल्याणासाठीं विद्वान् मनुष्यें एकत्र जमून विचार करूं या- मग हळू हळू पायरी पायरीनें हिंदु आयुष्यक्रमांत व हिंदु धर्मांत जीव परत आणून ज्यास मान द्यावयाचा त्यास तो देऊं या आणि ब्राह्मण जर पवित्र असेल आणि आध्यात्मिक ज्ञान त्यास असून अध्यापन करण्यास जर तो समर्थ असेल तर त्यास मान देऊं या व नुसत्या वर्णव्यवस्थेच्या नांवास नव्हे तर खऱ्या वर्णव्यवस्थेस मान देऊं या. असें झालें ह्मणजे बाह्यांस नव्हे पण आंतील सत्य तत्वास तो देऊं या. जी खराबी झाली आहे ती नष्ट होऊन समाजाची कांहीं कालानें उन्नति होईल. आपणांला पुढें काम आहे तें हें आहे. ज्यामध्यें मला मदतनीस घ्या असें माझें मागणें आहे तें हेंच काम. जो जीव हिंदुस्थानांतून गेला होता तो परत हिंदुस्थानास अर्पण केला आहे व तो आर्य लोकांच्या सेवेस अर्पण होईल.

# भारत, गीता व रामायण.

आर्यधर्मदर्पण:— उत्तम मोहोरेदार कागदावर नियमितपणें प्रसिद्ध होत असलेल्या ह्या रॉयल अष्टपत्री ९६ पृष्ठांच्या मासिक पुस्तकांत ज्ञानाचें अनादि भांडार ह्मणून महशूर असलेले श्रीमहाभारत, अध्यात्मविषयक ग्रंथांपैकीं प्रमुख योगवासिष्ठ आणि धर्मशास्त्रविषयक ग्रंथाचे शिरोभागीं असलेला पराशरमाधव हे ग्रंथ सरळ व सुबोध मराठी भाषांतरासह प्रसिद्ध होत असतात. पांच वर्षेंपर्यंत ह्याचीं पृष्ठें ४८ असून वर्गणी टपालहंशिलासह ४०६ होती. सहावे वर्षापासून ९६ पृष्ठें केलीं आहेत व वर्गणी ट. ह. सह ६०१२ केली आहे. मासिक पुस्तक सुरू झाल्यास ५ वर्षें संपूर्ण होऊन सहावें चालू आहे. इतक्या अवधींत श्रीमहाभारतांतील आदिपर्व, सभापर्व व वनपर्व हीं तीन संपूर्ण होऊन चवथें विराटपर्व संपत आलें आहे आणि योगवासिष्ठाचीं पहिलीं दोन प्रकरणें संपून तिसरें सुरू आहे. या मासिक पुस्तकाची वर्षाची अगाऊ वर्गणी ट० ह० सह

६०१२ आहे. ४८ पृष्ठांचें मासिकपुस्तकच ज्यांना पाहिजे असेल त्यांना ४०६ च पडतील. मागील पांचही वर्षांचे सर्व अंक ग्राहकांना जास्त किंमत न पडतां १२ अंकांना ४०६ ह्या किंमतींतच मिळण्याची सवड ठेविली आहे.

आर्यधर्मरहस्यः— ह्या डेमी अष्टपत्री ४० पृष्ठांच्या मासिकपुस्तकांत भगवद्गीता येत असते. प्रथमतः गीतेंतील श्लोक, नंतर त्या श्लोकाचें सरळ व सुबोध मराठी भाषांतर; गीतेवरील संस्कृत व प्राकृत अद्वैतपंथी टीकांना मुख्य आधारभूत असलेलें श्रीमच्छंकराचार्यांचें भाष्य; नंतर सदहू भाष्याचें सरळ व सुबोध भाषांतर; स्थलविशेषीं भाष्याचें स्पष्टीकरण आणि भाष्याला धरून नसलेल्या गीतेवरील अद्वैतपंथी टीकांचा युक्तायुक्त विचार; येणेंप्रमाणें विषयांचा क्रम ठेविला आहे. मासिक पुस्तकाचें पहिलें वर्ष संपूर्ण होऊन दुसऱ्या वर्षाचे ६ अंक निघाले आहेत. वर्षाची अगाऊ वर्गणी ट० हं० सह २०६ आहे.

मोदवृत्तः—ह्या साप्ताहिक पत्रांत राजकीय व धार्मिक

येत असून ग्राहकांना जगन्मान्य संस्कृत ग्रंथांचीं ८०० पृष्ठें मराठी भाषांतरासह ह्या मासिक पुस्तकाच्याच आकाराचीं मोहोरेदार कागदावर छापिलेलीं मिळत असतात व येत्या गोकुळ अष्टमीस सुरू होणाऱ्या नव्या सालापासून संग्रह करण्यास योग्य अशीं एकंदर १२०० पृष्ठें प्रतिवर्षी मिळणार आहेत. ह्या पृष्ठांसह ह्याचा वर्षाची अगाऊ वर्गणी फक्त दोन रुपये असून परगांवच्या ग्राहकांना ०।३ टपाल हंशील रीतीप्रमाणें वेगळें द्यावें लागतें. आजपर्यंत श्रीवाल्मीकिरामायणापैकीं बालकांड, अयोध्याकांड, अरण्यकांड, किष्किंधाकांड व सुंदरकांड हीं पांच कांडें संपूर्ण होऊन आतां दोनच उरलीं आहेत. ८-७-१८९९

काशीनाथ वामन लेले,
वाई, जि. सातारा.

